# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२०/०८/१७

## दि.१९/०८/१७ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ४००/१७,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | सलीम शेख,वय-३८,रा.नांदेड |
| **आरोपी** | महमुद सादुल्ल शेख (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०८/१७ रोजी १६/०० वा.बि-विंग,बिल्डींग,कोलते-पाटील,स्टारगंज बांधकाम साईट, बावधन-बुद्रुक,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम महमुद सादुल्ल शेख या ठेकेदाराने त्याचे बि-विंग,बिल्डींग,कोलते-पाटील,स्टारगंज बांधकाम साईट,बावधन-बुद्रुक,पुणे येथील बांधकाम चालु असलेल्या साईट वरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार आलीम जमनसाब शेख,वय-३८,रा.कोलते-पाटील स्टार गंज लेबर कॅम्प,बावधन-बुद्रुक,पुणे हा इमारतीचे आठव्या मजल्यावर सेंट्रींगचे काम करीत असताना,त्याचा पाय घसरून तो आठव्या मजल्यावरून खाली पडुन,त्यांचे डोक्यास गंभीर दुखापत होवुन,तो मयत झाला. (फिर्यादी यांनी त्यांचा भाऊ आलीम शेख याचा अंत्यविधी केल्यानंतर आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए एम पगारे |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३४७/१७,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | प्रशांत कुंभार,वय-४०,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.११/०८/१७ रोजी सकाळी ११/०० ते दि.१८/०८/१७ रोजी सकाळी ११/३० वा.चे दरम्यान पीएमसी कॉलनी नं.७,येथील मनपाचे कोठीमधुन |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पुणे महानगरपालीका येथे प्रभाग अधिकारी या पदावर असुन,मनपा क्षेत्रिय कार्यालया भवानी पेठ यांचेकडील गणेशोत्सवासाठी लागणारे लोखंडी जाळया व ॲगल पीएमसी कॉलनी नं.७,येथील मनपाचे कोठीमध्ये कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे कोठीचा लाकडी दरवाजा तोडुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,कोठी मधील १२ फुट लांबीचे ०५ लोखंडी अँगल व ६.६ लांबी रूंदिच्या लोखंडी ०५ जाळया असा एकुण ६ हजार रू किमतीचे घरफोडी चोरी करून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. ए बी तुपे |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३२१/१७,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | अर्चना वझे,वय-३३,रा.वारजे,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/१७ रोजी १४/०० ते १५/३० वा.चे दरम्यान स्वाती सदन बिल्डींग,तपोधाम वारजे, पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्याचे दागिने असा एकुण २,०४,०००/- रु किचे सोन्याचे दागिने किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. निकम ९८२३२०७७४६ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३०८/१७,भादविक ४५४,४५७,३८०,५११ |
| **फिर्यादी** | सुरेखा भागवत,वय-५७,रा.शिवतीर्थनगर,कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०८/१७ रोजी २०/३० वा ते दि.१९/०८/१७ रोजी १३/०० वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे प्रसन्न गार्डन सोसायटी,शिवतीर्थनगर,कोथरूड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य लोखंडी दरवाजाचा कोयंडा कशाचे सहायाने तरी कापुन,आतील लाकडी दरवाजाचे लॉक उचकटुन,आत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने व रोख असा एकुण ८,६४,०००/- रू किचा ऐवज घरफोडी चोरी करून चोरून नेला. तसेच फिर्यादी यांचे सोसायटी मध्ये रहाणारे ढेपे यांचेही घरी घरफोडी चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जाखडे ९४२२५०८५३४ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे ३०७/१७,भादविक ४५४,४५७,३८०,५११ |
| **फिर्यादी** | दिप्ती निरंजन भालेराव वय ३१ रा-वदावन सोसा फ्लॅ नं् ४ चैतन्यनगर धनकवडी पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०८/१७ रोजी २१/०० वा. ते दि.१९/०८/१७ रोजी सकाळी ०८/०० वा.चे दरम्यान फ्लॅ नं.१२,बि.नं.६,प्रतीकनगर ,पौड रोड,कोथरूड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे आई-वडील राहत असलेल्या फ्लॅट नं.१२, बि.नं.६,प्रतीकनगर,पौड रोड,कोथरूड,पुणे हा कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील चांदीचे भांडे ४०००/- रू किचे घरफोडी चोरी करून नेले. तसेच त्याच बिल्डींग मधील फ्लॅ नं.०५,१४ व २०,तसेच शेजारील बि.नं.०५ चे फ्लॅट नं.०५ व ०९ मधील फ्लॅटचा दरवाजा कडी-कोयंडा कशाचे तरी सहायाने उचकटुन करण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. राऊत ९८२२४६५६७८ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे २१३/१७,भादविक ३८४,३४१,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५०,रा.धनकवडी,पुणे |
| **आरोपी** | १.मयुर परशुराम उत्तेकर,वय-२५,रा.एफ.सी.रोड,डेक्कन,पुणे २.सुनिल बाबुराव माने,वय-४९ रा.रहाटणी,पुणे (अटक) ३.बालाजी जगताप ४.राजु फुलकर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/१७ रोजी ११/०० वा. फर्गुसन कॉलेज रोड,डेक्कन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नमुद ठिकाणी फॅब्रिकेशनचा व्यवसाय असुन,फिर्यादी यांचे दुकानासमोर फुटपाथवर त्यांचे ओळखीचा इसम मयुर उत्तेकर यांचे सांगण्यावरुन कागदी बॉक्समध्ये कपडे विकणारे इसम व्यवसाय करीत असल्याने,फिर्यादी यांनी त्याचेकडे सदर बाबत चौकशी केली असता,त्याने फिर्यादी यांचा रस्ता अडवुन त्यांना शिवीगाळ करुन धमकी दिली आहे. तसेच त्याने सदरची जागा स्वयंघोषीत अ.क्रं.२ ते ४ याचेकडुन भाडयाने घेतली असलेबाबत सांगितले आहे. |

त्याचप्रमाणे सदर इसम हा कपडे विक्री करणा-या इसमांकडुन दररोज ५००/- रु हप्ता घेत असुन,त्याने सदर ठिकाणी असणा-या दुचाकी व गॅरेज मधील मोटार सायकलची मोडतोड करुन नुकसान केले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. कोळंबीकर

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** बिबवेवाडी पो स्टे २४१/१७,भादविक ३५४(ब),३२३,५०४,५०६(१)

**फिर्यादी** एक महिला,वय-४५,रा.पुणे

**आरोपी** अक्षय आबाजी अहिवळे,रा.सुखसागर,बिबवेवाडी,पुणे (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.१९/०८/१७ रोजी ०८/३० वा. साई वॉशिंग सेंटर गांधीनगर,पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी हया पुणे मनपाचे सफाई कामगार असुन,त्यांनी ओला व सुका कचरा वेगळा करा असे यातील नमुद इसम अक्षय अहिवळे यास सांगितल्याचा कारणावरुन त्याने फिर्यादी यांचा विनयभंग करुन,त्यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून धमकी दिली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. देवकाते ९८२३०१९५१२

८

**पो.स्टे.गुरनं./कलम** चिंचवड पो स्टे २२५/१७,भादविक ३७९

**फिर्यादी** सुरज तरडगांवकर,वय-४७ वर्षे,रा.चिंचवडेनगर,चिंचवड,पुणे

**आरोपी** अज्ञात

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०२/०८/२०१७ रोजी १४/०० ते १४/४५ वा.चे दरम्यान रांका ज्वेलर्सचे पाठी मागील पार्किंग मधुन,एम्पायर इस्टेट,चिंचवड,पुणे येथुन

**तपशिल** यातील फिर्यादी यांनी त्यांची स्कुटरचे डिकी मध्ये ५,७१,०००/- रुपये रोख रक्कम ठेवुन ती स्कुटर रांका ज्वेलर्सचे पाठीमागील पार्किंग मध्ये लॉक व पार्क करुन ठेवलेली असताना, कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचेतरी सहाय्याने त्यांचे स्कुटरची डिकी खोलुन, त्यामध्ये ठेवलेले ५,७१,०००/- रुपये रोख रक्कमेची बॅग व बॅंकेचे चेकबुक व पासबुकसह चोरी करून नेले. (फिर्यादी यांची मानसिक स्थिती ठिक नसल्याने तसेच त्यांनी बॅंकेचे पासबुक बॅंकेत जावुन बंद करून आज रोजी तक्रार दिली आहे.)

**त.अंमलदार** म.पो.उप.निरी. ढेरे

९

**पो.स्टे.गुरनं./कलम** येरवडा पो स्टे ७०५/१७,भादविक ४२०,४६७,४६५,४७१ व महाराष्ट्र मुल्यवर्धित कर कायदा २००२ चे क.७४,उप कलम (१)(ब),क.७४ चे उप क.(१)(अ),क.७४ चे उप क.(२)(४)(५)

**फिर्यादी** प्रकाश कुलकर्णी,वय-४१ वर्ष,(वस्तु व सेवा कर भवन,येरवडा,पुणे)

**आरोपी** १.विलास विठ्ठल वाळुंज,रा.सी १/५,राजश्री विला भोसले पॅराडाईज,रेंज हिल रोड,पुणे २.एक महिला (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०१/०४/२०१० रोजी ते आजपर्यंत पुणे विभाग कार्यक्षेत्रात पुणे

**तपशिल** यातील फिर्यादी हे सहायक आयुक्त या पदावर सेवा व कर विभाग कार्यालय,येरवडा, पुणे येथे नेमणुकीस असुन,यातील नमुद इसम व महिला यांची लिटल मास्टर ऑटो कास्ट प्रा. लिमी. या नावाची ॲटो पार्टस बनविण्याची कंपनी असुन ते सदर कंपनीचे डायरेक्टर आहेत. त्यांनी आपसात संगनमत करून जाणीवपुर्वक विक्रीकर बुडविण्याचे उद्देशाने कराचा शासकिय तिजोरीत भरणा केलेला नाही.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. देशमुख

१०

**पो.स्टे.गुरनं./कलम** भारती विद्यापीठ पो स्टे ४१२/१७,भादविक २८५,३३७,३३८

**फिर्यादी** अनिल गौतम,वय-३८ वर्षे,रा.सुखसागरनगर,कात्रज,पुणे

**आरोपी** सुधीर रघुनाथ बारोट,रा.लालबाग सोसायटी,सुखसागरनगर,पुणे

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०८/२०१७ रोजी १२/०० वा.शुभम मेटल (भांडयाच्या कारखाना),१५/ए, सुखसागरनगर, कात्रज,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे सोबत काम करणारे कामगार हे शुभम मेटल (भांडयाच्या कारखाना),१५/ए, सुखसागरनगर, कात्रज,पुणे या भांडयाच्या कंपनीत छोटा हत्ती टेंपोतील ॲसिडने भरलेले कॅण्ड खाली करीत असताना,त्यातील ॲसिडने भरलेला एक कॅण्ड जमिनीवर पडल्याने तो फुटुन,त्यातील ॲसिड फिर्यादी व त्यांचे सोबतचे इतर कामगारांचे अंगावर पडल्याने ते जखमी झाले आहेत ते खालीलप्रमाणे -<br>१.कुमार कवी,वय-१९,रा.सुखसागर नगर कात्रज,पुणे २.कुमार शिवप्रसाद,वय-२१,रा.सदर ३. मिना शरद सोनी,वय-४०,रा.सदर ४.मथुरा श्रीराम राठोड,वय-४०,रा.बिबवेवाडी,पुणे ५.सुनिता अनिल नागरे,वय-३५,रा.सुखसागरनगर,कात्रज,पुणे ६.सुमन शंकर मोहिते,वय-५७,रा.सदर ७. अनिल रामधवन गौतम,वय-३९,रा.सदर ८.अजय शिवाजी कांबळे,वय-१९,रा.सदर ९. बायडाबाई एकनाथ खडसे,वय-५०,रा.सदर,यातील अ.नं.१ ते ३ यांचे डोळयाला व चेह-याला दुखापत झाल्यामुळे खाजगी हॉस्पीटल येथे उपचार घेत असुन,अ.नं.४ ते ९ यांना किरकोळ जखम झाल्यामुळे प्रथमिक उपचार करुन घरी सोडण्यात आले आहे. तरी यातील नमुद इसम सुधीर बारोट याने त्याचे भांडयाचे कारखान्यात ॲसिड हाताळणे करीता कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,सदरची घटना घडली असल्याची फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, दत्तात्रय मदने ९८८१३७०५०१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**